# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 6659174,172,173

Website : www.muhs.ac.in, E-mail :sw@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Registrar**


मआविवि/एसडब्लु/एनएसएस/ ५२८ /२०२०　　　　　　　　　　दि. ११ /०३/२०२०

प्रति,
मा. अधिष्ठाता / प्राचार्य,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये,
मआविवि, नाशिक.

**विषय :** कोरोना विषाणू Novel Coronavirus (Covid 19) जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेबबात...

**संदर्भ :** १) विश्वविद्यालय अनुदान आयोग,नवि दिल्ली यांचे दि.०५ मार्च,२०२० रोजीचे पत्र.
२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्रक्र. Z-21020/14/2020-PH दि.०५/०३/२०२०.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांचे माहितीपत्रक.

महोदय / महोदया,

देशातील काही भागांमध्ये कोरोना विषाणू संसर्ग झालेले रुग्ण आढळत आहेत. त्याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी सर्व संलग्नीत महाविद्यालये, विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारीवृंद तसेच जनसामान्य नागरीकांसाठी जनजागृतीपर व प्रतिबंधात्मक उपाययोजना (प्रत संलग्न) जाहीर केलेली आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने १) शिक्षण संकुलात विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने एकत्र न जमणे २) शिंकताना, खोकताना नाका-तोंडासमोर रुमाल धरणे अथवा मास्क असावे ३) वेळोवेळी साबण अथवा निर्जतूकरण द्रवाने हात स्वच्छ करणे ४) वारंवार हातांचा स्पर्श डोळे, नाक व चेहऱ्याला होणार नाही याची काळजी घ्यावी. ५) परदेशी जाऊन आलेल्यांची तपासणीचा आग्रह धरुन त्यांची माहिती स्थानिक यंत्रनेला वेळीच देण्याची खबरदारी घेण्यात यावी. ६) तसेच स्वत:सह कुटुंबीय व परिचितांपैकी कुणी आजारी असल्यास तातडीने त्यावर उपचार करावेत. इत्यादी बाबींचा समावेश आहे.

सबब, महाविद्यालयांनी आपल्या परिसरातील नागरीकांचे जनजागृतीपर प्रबोधन करण्यासाठी होर्डीगज, माहितीपत्रक (पोंम्पलेट) व ध्वनीप्रक्षेपणाव्दारे वैयक्तीक स्वच्छता, परिसर स्वच्छता, द्रव व साबण याव्दारे निर्जतूकीकरण व आवश्यक त्या वेळोवेळी करावयाच्या स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच नागरीकांमध्ये भीती व चुकीच्या अफवा पसरणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

कुलसचिव

**सोबत वरील प्रमाणे.**

E:\NSS 2019\letter\Jan 2019.Doc